REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2022

# चिमुर-आष्टी स्वातंत्र्य आंदोलनातील नागपुरच्या झुंजार नेतृत्व अनुसयाबाई काळे यांच्या योगदानाची विश्लेषणात्मक समीक्षा

डॉ. यमुना वा. रेवतकर
**इतिहास विभाग,**
मनोहरराव कामडी महाविद्यालय, नागपूर.

सारांश :

विदर्भ हा महाराष्ट्राचा एक महत्वपूर्ण घटक प्रदेश आहे. हा प्रदेश नैसर्गिकदृष्ट्या संपन्न असून प्राचीन काळापासून राजकीय व सांस्कृतिक परंपरांचा वारसा त्याला लाभलेला आहे. अशा या भुमीत श्रेष्ठ दर्जाची स्त्रीरत्ने जन्माला आली. अनेक गुणवैशिष्ट्याच्या स्वातंत्र्य संग्रामातील स्त्रियांचा सहभागाला भारतीय ऐतिहासिक परंपरेची जोड आहे. या दृष्टिने भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील विदर्भातील महिलांच्या कार्याचे महत्व फार मोठे आहे.



## प्रस्तावना

भारतीय वेदकाळातील स्त्रीजीवन हे मानाचे आणि उच्च दर्जाचे होते. कोणत्याही देवाला स्त्रीतत्वाशिवाय पुर्णत्व येत नाही असे आर्यांनी मानले होते. त्याकाळातील स्त्रियांचे स्वातंत्र्य व्यक्तीमत्व स्त्रीला आपले बौद्धीक आणि आध्यात्मिक जीवन समुद्ध करण्यासाठी शिक्षणाची संधीही प्राप्त झाली होती. महाराष्ट्रातील तेराव्या ते सतराव्या शतकातील अनेक स्त्रिया सामाजिक, आध्यात्मिक व राजकीय क्षेत्रात पुढे आल्या होत्या. मराठयाच्या इतिहासात जिजाबाई, ताराबाई, इुमाबाई दाभाडे, अहिल्याबाई होळकर यासारख्या कर्तबगार, मुत्सद्दी व शूर स्त्रियांनी फार मोठे कर्तृत्व गाजविले होते. १९ व्या शतकाच्या पुर्वार्धात महाराष्ट्रात बौद्धीक जागृतीची व वैचारिक परिवर्तनाची लाट पसरली होती, याचकाळात महाराष्ट्रामध्ये स्त्रियांच्या उत्थानासाठी ज्या चळवळी झाल्या, त्या चळवळीत कै. अनसूयाबाई काळे यांचे स्थान आणि कार्य अत्यंत महत्वाचे आहे. महात्मा ज्योतीबा फुले यांच्या पत्नी के सौ. सावित्रीबाई, शारदा सदनाच्या संस्थापिका पंडिता रमाबाई आणि अखिल भारतीय महिला परिषदेच्या प्रवर्तका कै. रमाबाई रानडे या एकोणविसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील तीन प्रमुख कर्तबगार महिलांनी महाराष्ट्रातील स्त्रियांच्या उन्नतीच्या कार्याचा शुभारंभ केला व कै. रमाबाई रानडे यांनी आपल्या पतीच्या मृत्युनंतर सेवासदनापासून ते महिला परिषदेपर्यंत निरनिराळ्या संघटना निर्माण करून सतत तेवीस वर्षे ही चळवळ मोठ्या हिमतीने चालविली. त्याचप्रमाणे कर्मवीर कै. अण्णासाहेब शिंदे यांच्यापासून स्फुर्ती घेऊन त्याच्या भगिनी कै. जनाबाई शिंदे यांना दलित जातीतील स्त्रीयांच्या उद्धाराचे जे कार्य केले तेही या तीन आदयरामाजसेविकांच्या कामगिरीइतकेच संस्मरणीय

आहे. या सर्व भगिनींच्या मानाने १९२० साली पुढे आलेल्या सौ. अनसूयाबाईना एकंदर परिस्थितीची आणि लोकमताचीही अनुकूलता अधिक लाभली हे निःसंशय पण, त्याचबरोबर नागपूरच्या भगिनी मंडळासारख्या स्थानिक संस्थपासून ते महिला परिषदेसारख्या अखिल भारतीय स्वरूपाच्या विशाल संस्थेपर्यंत व प्रांतीक विधीमंडळापासून ते संसदेपर्यंत नाना प्रकारच्या सामाजिक, राष्ट्रीय, वैधानिक आणि शासकीय संस्थान जितक्या प्रकारची विविध कामगीरी त्यांनी केली तितकी गेल्या चाळीस वर्षात दुस-या कोणत्याही मराठी महिलेने केलेली नाही.

१९३० साली स्त्रियांच्या दृष्टिकोनातून महात्मा गांधीजीनी मोठी क्रांती घडवुन आणली. दारूच्या दुकानावर निरोधने करणे, परदेशी कापडाचे पिकेटिंग करणे, शाळा-कॉलेजावर बहिष्कार घालणे ही कामे स्त्रियांनीच केलेली आढळतात. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनाच्या वेळी चंद्रपूर जिल्हयातील चिमुर गावातील महिलावर झालेल्या अत्याचाराच्या अंगावर शहारे आणणाच्या कथा आणि अनसूयाबाईनी त्या अत्याचाराविरूद्ध केलेला यशस्वी प्रतिकार सर्व स्वातंत्र्य सैनिकांसाठी प्रेरणा देणारा ठरला आणि चिमुर गाव सत्याग्रहासाठी बनले. थोडक्यात गांधी युगात प्रथमच स्त्रिया राजकारणात शिरल्या स्त्रियांनी राष्ट्रीय चळवळ व कायदेभंगाच्या चळवळीस जो सक्रिय व स्वार्थत्यागपूर्वक पाठिंबा दिला त्यामूळे स्त्रियादेखील सविनय कायदेभंगाच्या चळवळीस पुरुषाच्या खादयाला खादा लावुन सरकारशी लढू शकतात हे सिद्ध झाले. ज्या बायकाचे नखदेखील लोकास दिसावयाचे नाही अशा पडदानशील बायकादेखील राष्ट्रीय चळवळीत सामील झाल्या व अशा स्त्रियांनी आपल्या कर्तबगारीने सार्वजनिक व राजकीय जीवनाची ही दोन्ही अंगे पुरुषाच्या बरोबरीने उजळून काढली. अशा स्त्रियात के सौ. अनसूयाबाई काळे यांना अग्रपूजेचा मान दयावा लागतो. नागपूर विदर्भात एक काळ असा होता को अनसूयाबाई काळे यांनी त्याच्या कर्तबगारीने जनतेला भारावून टाकले होते. अनसूयाबाई यांचा धाडसी स्वभाव पाहून कोणती कारवाई करावी याबाबत सरकारही संभ्रमित झाले होते. अशा कर्तृत्ववान कै. सौ. अनसूयाबाईना स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होण्यासाठी कोणती परिस्थिती कारणीभूत होती, त्यांचे राजकीय कार्ये, सामाजिक कार्ये, स्वातंत्र्य लढयात त्यांचे योगदान काय होते. या सर्व बाबींचा यांच्या कृतज्ञता बुद्धीने माहिती करून घ्यावी म्हणून सदर विषयाची निवड केली.

तसेच आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये अनेक थोरमोठ्या लोकांचा राष्ट्रीय आंदोलनात सहभाग होता. परंतू ज्यांनी आपली सर्व शक्ती या आंदोलनात ओतली; त्या सौ. अनसूयाबाईचा उल्लेख कुठेच दिसून येत नाही. याचे आश्चर्य वाटते म्हणून सदर विषयाची निवड केली. प्रत्यक्ष भाग घेतला नसला तरी कांग्रेस कार्यकर्त्यांना जी मदत लागल; ती दयायची त्यांनी ठरविले होते.

**चिमुर-आष्टी प्रकरण :**

१९४२ च्या ऑगस्टमध्ये चिटणीस पार्कमध्ये सभा घेण्यात आली होती. या सभेमध्ये अनसूयाबाईनी सरकारच्या दमननीतीची निर्भत्सना करणारे जे भाषण केले होते ; त्या भाषणाचा जनतेवर फार चांगला परिणाम झाला होता. (२४) तिकडे चिमुर-आष्टीलाही दडपशाही सुरू झाली होती. चिमुर-आष्टी हत्याकांडाची प्रकरणे नागपूर जिल्हयाच्या कक्षेबाहेर येत असली तरी या हत्याकांडात फाशीची शिक्षा झालेल्या कार्यकत्यांना मुक्त करण्याचे सर्व प्रयत्न नागपूरहून होत होते व ती प्रकरणे एवढी चित्तथरारक होती की त्या प्रकरणामुळे नागपूर प्रांताचे नाव सा-या हिंदुस्थानात कमालीचे गाजले होते. चिमुर आणि आष्टी ही दोन अगदी वेगळी गावे आहेत. चिमुर चंद्रपूर जिल्हयात तर आष्टी हे वर्धा जिल्हयात येते पण भारत छोडो आंदोलनाच्या संदर्भात दोन्ही गावांचा एकत्र उल्लेख होतो. त्याचे कारण असे की दोन्ही ठिकाणची आंदोलने

जवळपास सारखीच आहेत तसेच अत्याचार आणि प्रतिकार हे देखिल सारखेच आहेत. **२५** १६ ऑगस्ट १९४२ रोजी वर्किंग कमिटीच्या सर्व मंडळींना सरकारने तुरूंगात टाकले होते. त्यामुळे सर्व हिंदुस्थानात त्यांचा प्रक्षोभ झाला. त्याचे पडसाद चिमुरलाही उतरले व लोकांनी प्रभातफेरी काढण्याचा विचार केला. दुसऱ्या दिवशी सकाळी प्रभातफेरी काढली. तेव्हा त्यांचे नेतृत्व बालाजी रायपूरकर या लहान मुलाने व प्रभातफेरीचे मुख्य संचालक श्री. गोपाळ करिकर यांनी केले होते. सबइन्स्पेक्टर श्री हरिनाथ शर्मा यांनी लोकांनी प्रभात फे-या काढू नयेत असा हुकूम अगोदरच गावात जारी केलेला होता. अशा प्रक्षुब्ध वातावरणात प्रभातफेरी बालाजी मंदीरापर्यंत पोहचली तेव्हाच पोलिसांनी गोपाळ कोरेकर यांना अटक केली. त्यांना सोडविण्याकरिता मुले पोलीस स्टेशनवर गेली. त्यावेळी त्यांना अत्यंत कुरपणे लाठयांनी झोडपण्यात आले होते. त्यातच कुमार बालाजी रायपूरकर याला जास्त मार बसल्यामुळे त्याच दिवशी त्याचा अंत झाला. त्यामुळे लोक अधिकच चिडले व पोलिसांवर धावुन गेले. त्यावर इन्स्पेक्टर जरासंध याने जमावावर गोळीबार करण्याचा हूकुम दिला. त्यामुळे जमाव एस. डी.ओ. डुंगाजीच्या बंगल्यावर गेला होता. श्री. डुंगाजी बाहेर आले व त्यांनी 'बंदुक लाव' असे ओरडले. हे शब्द ऐकताच जमाव मागे सडकेवर गेला व तिथुन जमावाने दगडाचा माराचालविला. श्री. डुंगाजीनी सर्कल इन्स्पेक्टर जरासंध याचीच बाजु उचलून धरली होती. संतप्त जमावाने श्री. डुंगाजीच्या रेस्ट हाऊसला आग लावताच ते घाबरून बाहेर आले . बाहेर आल्याबरोबर जमावांनी त्याच्यावर लाठयांचा प्रहार करून त्यांना ठार केले. १९ ऑगस्ट १९४२ रोजी लष्कराने चिमुरमध्ये जाळपोळ अधिकाऱ्यांना जिवत जाळणे, मार्शल लॉ, स्त्रियांची अवहेलना, त्यांच्यावर अत्याचार वगैरे प्रकार केले होते. अशास्थितीत अनसूयाबाईजी चिमुरच्या भितीग्रस्त स्त्रियांना धीर देण्याचे ठरविले . कारण गावातील सर्व पुरुषमंडळी अटकेत होती व बाहेरच्या पुरूषांना गावाच्या चतुःसिमेत जाण्याची परवानगी नव्हती. बाहेरच्या स्त्रियांनाही चिमुरला जाण्याची काही दिवस बंदी होती. अशावेळी अनसुयाबाईनी अधिका-यांशी भे्टूनचिमुरला जाण्याची परवानगी मिळविली होती. त्यानुसार २९ सप्टेंबरला डॉ. वझलवार, सौ. विमलाबाई देशपांडे, सौ दारकाबाई देऊसकर,. कु विमलाबाई अभ्यंकर व रमाबाई तांबे या नागपूरच्या पाच भगिनीन चिमुरला जावून तेथील महीलाचे सांत्वन केले. **(२७),** नंतर अनसूयाबाईनी नागपूरहून धान्य आणि कपडे जनतेकडून गोळा करून चिमुरला पोहचविले होते.

### भन्साळीचे उपोषण :

चिमुर आष्टी प्रकरणातुनच पुढे भन्साळी प्रकरण निर्माण झाले होते. लष्कराने चिमुरच्या स्त्रियांवर जे अत्याचार केले त्याची वार्ता ऐकून इतर सर्वांबरोबर प्रा. भन्साळी हे व्यथित झाले व त्यानी झालेल्या अत्याचाराची चौकशी व्हावी म्हणून ११ नोव्हें १९४२ ला प्राणंतिक उपोषणाला प्रारंभ केला होता. तीस चाळीस दिवस उपोषण झाल्यावर भन्साळींची प्रकृत खालावली. ते आता जातात की काय अशी स्थिता आली त्यावेळी के .एम. मुन्शी नागपूरला आले. मुन्शी है भन्साळीचे मित्र आणि ख्यातनाम कायदेपंडित होते. त्यांनी डॉ ख-यांच्यामार्फत काही तडजोड होते की काय याची खटपट सुरू केली होती. डॉ. खऱ्यानी भन्साळीला तपासावे म्हणून प्रयत्न सुरू केले परंतू डॉ. खरे वध्याला जाण्यास तयार नव्हते. तेव्हा अनसूयाबाई डा ख-यांच्या घरी गेल्या व त्यांना म्हणाल्या, 'माणूसकी म्हणून म्हणा, डॉक्टर म्हणून म्हणा की प्रोटेस्टट काँग्रेसमन म्हणून म्हणा, तुम्हाला माझ्याबरोबर वर्धेला आलेच पाहिजे' डॉ. ख-यांना सोबत घेतल्याशिवाय त्या घरून परत जायलाही तयार नव्हत्या . तेव्हा त्यांच्या हट्टापुढे नमुन शेवटी ६ जानेवारी १९४३ रोजी डॉ खरे वर्धेला गेले व त्यांनी भन्साळीची प्रकृती तपासली, **(१०)** , उपोषण अजुन सुरूच होते.

भन्साळी यांच्यासंबंधी बातम्या किंवा अन्य दस्तएवजः छापण्यास मध्यप्रांताच्या व मुंबईच्या सरकारांनी मनाई करणारे फसवे जारी केले होते. वृत्तपत्रावर बंदी आणल्यामुळे मुंबई प्रांतातील टाइम्स ऑफ इंडिया' या वृत्तपत्राव्यतिरिक्त अन्य सर्व वृत्तपत्रानी यांचा विरोध केला. १ जानेवारी १९४३ रोजी देशभरच्या बहुतेक वृत्तपत्रांनी निषेध म्हणून सरकारतर्फे

प्रसिद्धिसाठी देण्यात आलेली मानक-यांच्या नावाची यादी छापलीच नाही. ६ जानेवारीला शंभराहून अधिक वृत्तपत्रांनी एक दिवसाचा हरताळ पाळला होता. १२ जानेवारी १९४८ हा भन्साळींच्या उपोषणाचा ६३ वा दिवस होता. त्या दिवशी मध्यप्रांताचे मुख्य सचिव जयरत्न यांनी भन्साळीसंबंधी बातम्या, लेख वगैरे छापण्याबद्दलचे निबंध रदद केल्याचे जाहिर केले . तेव्हा वृत्तपत्रांनी भन्साळींच्या उपोषणाच्या बातम्या छापायला सुरुवात केली. डॉ. ना. भा. खरे, श्रीमती अनसूयाबाई काळे आणि कन्हैय्यालाल मुन्शी यांनी मध्यस्थी करून भन्साळी आणि मध्यप्रांताचे सरकार यांच्यामध्ये समझौता घडवून आणला आणि त्यानंतर भन्साळींनी आपले उपोषण मागे घेतले होते.

**फाशीनिवारण समिती :**

चंद्रपूरात चिमुरसंबंधी जे खटले दाखल झालेले होते ते बरेच दिवस चालून त्याचा ५ डिसेंबर १९४२ रोजी निकाल लागला होता. जवळजवळ २०० लोकांना शिक्षा ठोठवण्यात आल्या होत्या. त्यात सात आरोपींना फाशीची शिक्षा, ३०-३५ लोकांना जन्मठेपेची व बाकीच्यांना निरनिराळ्या मुदतींच्या शिक्षा झाल्या होत्या. दोन दोषमुक्त सुटले होते. (१३९) ऑगस्ट १९४२ च्या दंगलीत नागपूरात जी नवाबपूज्यात दंगल झाली होती. त्यात शंकर कुणबी या व्यक्तीला फाशीची शिक्षा झाली होती. शंकरला या शिक्षेविरूद्ध अपील दाखल करावयाचे होते. परंतू पेपरबुक' तयार करण्याकरिता लागणारे ३०० रूपये तो जमा करू शकला नाही. त्यामुळे त्याच्या फाशीची तारिख निश्चित करण्यात आली होती. डॉ. खरे यांना ही हकीकत कळल्यानंतर त्यांनी शंकरची फाशी पुढे ढकलविण्यात यावी यासाठी आटोकाट प्रयत्न केले. पण त्याचा काही फायदा झाला नाही आणि शंकरला १९ जानेवारी १९४३ रोजी नागपूर सेंट्रल जेलमध्ये फासावर चढविण्यात आले होते. त्यामुळे नागपूरच्या नागरिकांमध्ये एकच खळबळ निर्माण झाली. २४ जानेवारीला काही नागरिक डॉ खरे यांच्या निवासस्थानी जमले असता त्यांनी या प्रश्नाचा सर्वांगीण विचार करून ऑगस्ट दंगलीत फाशीची शिक्षा झालेल्या आरोपींना शक्य तो मदत करण्याकरिता ७ फेब्रुवारी १९४३ रोजी 'फाशीनिवारक समीती' स्थापन केली होती **(५३)** या समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. खरे व कार्याध्यक्ष म्हणून सौ. अनसूयाबाई काळे यांची नियुक्ती करण्यात आली होती त्यानंतर एक दोन महिन्यातच डॉ. खरे यांची व्हाइसरायच्या इक्झिक्युटिव्ह कौन्सिलवर नियुक्ती झाली. त्यामुळे त्यांनी २५ एप्रिल १९४३ रोजी फाशीनिवारक समितीची बैठक बोलावुन हया संस्थेच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला व अध्यक्षपदाची माळ त्यांनी सौ. अनसूयाबाई काळे यांच्या गळ्यात घातली . त्यांनी प्रत्यक्ष चळवळीत भाग घेतला नव्हता. परंतु त्यांना या चळवळीत काम करायचे होते म्हणुन त्यांनी फाशी निवारक समितीकरिता तनमनधनाचे कार्य करण्यास सुरुवात केली होती. प्रथम निधी गोळा करणे आवश्यक होते म्हणुन त्यांनी पुणे. मुंबई, अहमदाबाद वगैर ठिकाणी दौरा काढला. वर्तमानपत्रातुन जाहिराती छापल्या.

व्हाइसरायच्या खाजगी सचिवाला पत्र लिहून चिमूर-आष्टी प्रकरणातील फाशीची झालेल्या आरोपीसंबंधी बोलणी करण्यासाठी व्हाइसरायची मुलाखत मागितली होती परंतु व्हाइसरॉयच्या खाजगी सचिवाने या पत्राला नकार कळविला असला तरी गव्हर्नर व व्हाइसरॉय यांच्याकडे दयेचे अर्ज करण्याची मोहिम सुरू झाली व प्रिव्हीकौन्सिलकडे अपील करण्याचेही प्रयत्न सुरू झाले होते. याला निरनिराळ्या पक्षाच्या लोकांचा पाठिंबा होता. प्रिव्हीकौन्सिलमध्ये अखेरची तारिख आष्टी ८ व चिमूर १३ अशी होती पेपरबुकसाठी रक्कम भरण्याच्या अपिलाची तारिख लाबविण्यात आली तरीपण दिनांक २४ जुन रोजी प्रातीक सरकारने मुदतीच्या आत अपील न केल्यास फाशी देण्यात येईल अशी ताकीद दिली. १ सप्टेंबर १९४४ ला प्रिव्हीकौन्सिलला अपील करण्याकरिता १५० पौंड सॉलिसिटरनी पाठविले ३ डिसेंबर १९४४ ला अपील दाखल झाले व ५ डिसे, १९४४ ला अपील फेटाळण्यात आले होते अशारितीने न्यायाचे सर्व मार्ग कुंठित झाल्यावर केवळ दयाबुद्धीला आळविण्याचा मार्ग शिल्लक उरला. याद्दष्टीने गव्हर्नर आणि गव्हर्नर जनरल यांच्याकडे २ लक्ष सहयांचे दयेचे

अर्ज पाठविण्यात आले. हयाशिवाय ६००० सार्वजनिक संस्थानों दयेचे ठराव केले होते **(34)** १९४२ च्या चिमूर येथील दंगलीत प्राणास मुकलेले एस.डी. ओ श्री डुंगाजी यांच्या मातोश्री श्रीमती कुवरबाई यांनीही २७ डिसेंबर १९४४ रोजी गव्हर्नर हाईसरॉय यांच्याकडे विस्तृत अर्ज पाठवून फाशीची शिक्षा झलेल्या आरोपीवर दया दाखवावी अशी विनंती केली होती. जनतेच्या दडपणामुळे २९ जानेवारी १९४५ रोजी गव्हर्नरांनी पंधरापैकी आठ आरोपीची फाशीची शिक्षा रद्द केली पण आष्टी खटल्यातील तुळशीराम सखाराम पाचघरे, उकुंडया अडकुजी भोई व चिमूर खटल्यातील गोपाळ केशव कोरेकर, दादागणती बेलदार, विनायक बाबुराव भोपे, सखाराम दाजोबा सालेवार, व गणपत बालाजी न्हाई अशा एकूण सात जणांना फाशीचा प्रश्न अजून शिल्लक उरला होता.

चिमूर आष्टीच्या आरोपींना व विशेषतः फाशीची शिक्षा झालेल्या सात आरोपीना वाचविण्याचे शर्थीचे प्रयत्न अनसूयाबाईंनी केले होते. त्यांनाच सप्तचिरंजीव म्हटल्या गेले होते. याची शिक्षा रद्द व्हावी यासाठी प्रतिष्ठीत नागरिकानी दयेचा अर्ज पुन्हा पाठविला होता. तसेच अनसुयाबाईनी ३० जानेवारी १९४५ रोजी या सात जणाची फाशी रद्द करा अशी तार व्हाइसरॉयला केली होती

परंतु १३ मार्च १९४५ रोजी व्हाइसरॉय लॉर्ड वेव्हेल यांनी हा अर्ज फेटाळून लावला आणि सप्तचिरंजीवांना दिनांक २१ मार्च १९४५ रोजी फाशी देण्याचे निश्चित करण्यात आले त्यापूर्वी १२ मार्च रोजी सौ. अनसूयाबाई काळे आणि श्री. ए.श्री. पटवर्धन हे गांधीजींना भेटण्याकरिता वर्धेला गेले, दयेचे अर्ज फेटाळल्यानंतर काय कराये, असा त्याना गांधीजीना प्रश्न विचारला . त्यावर गांधीजींनी दिल्लीला खटपट करा असा सल्ला दिला. अनसूयाबाईनी श्री. भुलाभाई देसाईच पत्र घेऊन दिल्लीला प्रयाण केले. भुलाभाई देसाईंचे दाखवून त्यांनी व्हाइसरॉयचे प्रायव्हेट सेक्रेटरी सर जॉर्ज थार्न यांची भेट घेतली व ब्रिटनच्या राजाकडे या खटल्याचे पेपर्स पाठविण्याची विनंती केली . त्यावर थार्न यांनी राजा कधी पेपर्स बघत नाही म्हणुन पेपर्स पाठविण्याला नकार दिला . परंतू अनसूयाबाईंनी फारच आग्रह धरल्यामुळे त्यांनी अखेरीस पेपर पाठविण्याचे कबुल केले व दुसऱ्या दिवशी फाशी जाणाऱ्या लोकांच्या बाबतीत स्टेऑर्डर काढण्यात आली. अशाप्रकारे २१ मार्च रोजी सप्तचिरंजीव फासाच्या तख्यावर लटकता लटकता वाचले होते . दिल्लीहुन परतल्यावर अनसूयाबाई काळे यांनी २६ मार्चला गांधीजींची भेट घेऊन दिल्लीचा सर्व वृत्तांत सांगितला व २ एप्रिल १९४५ रोजी महात्मा गांधीजीचे पत्र घेऊन त्या पुन्हा दिल्लीला गेल्या . तिथे डॉ खरे व भुलाभाई देसाई यांच्या मदतीने दयेच्या अर्जाचा निकाल लागेपर्यंत शिक्षेची तहकुबी मिळविली होती. परतू दयेच्या अर्जाला बादशहाचा नकार आल्यामुळे दिनांक ६ एप्रिल १९४५ रोजी सातही आरोपींना फाशी देण्याचे निश्चित ठरले होते . त्यापूर्वी ४ एप्रिलच्या आत फाशी जाणाऱ्या लोकांच्या नातेवाईकांनी त्यांना तुरूंगात भेटावे अशी सूचना प्रांतीक (MA) सरकारने प्रकाशित केल्या होत्या. तेव्हा ३ एप्रिल १९४५ रोजी महात्मा गांधीजीनी उपोषणाचे निर्वाणीचे शस्त्र उगारून ब्रिटिश सरकारच्या धोरणाबाबतचा निषेध व्यक्त केला होता. हिंदुस्थानभर हरताळ पाळण्याचा आदेशांनी दिला होता. परिणामी देशात सर्वत्र हरताळ, उपोषण आणि निदर्शने सुरू झाले होते. (१) ३ एप्रिल १९४५ रोजी सौ. अनसूयाबाई काळे या दिल्लीला गेल्या व कायदेशीर सल्ला घेण्याकरिता थोडा वेळ मिळावा अशी त्यानी सरकारला मागणी केली. या वेळपर्यंत या केसमध्ये गुतलेल्या वकिलांनी आरोपींना फाशी शिक्षेतुन कसे सोडविता येईल, याचा अहोरात्र विचार केला. यात श्री रामभाऊ मनोहर, अड्व्होकेट घाटे, डॉ. केदार वगैरे अनेक नामांकित वकिल होते. याशिवाय डॉ. खरे, न्यायमुर्ती काकासाहेब पुराणीक, न्यायमुर्ती शंकरराव नियोगी इत्यादी वारंवार सल्लामसलतीचे कार्य करित होते. तरुण भारत या मराठी दैनिकाने तर निधी जमविण्याचा सपाटा चालविला होता. शेवटी या वकिलाना कायदेशीर पळवाट सापडली. फाशीची शिक्षा देणाऱ्या मॅजिस्ट्रेटने फाशीचे वारंट काढले पाहिजे असा क्रिमिनल प्रा. कोडच्या ३९१ . चा दंडक होता. (69) हे खटले स्पेशल: मजिस्ट्रेटने चालविले होते व त्यांची जागा आता रद्द करण्यात आली होती. त्यामुळे त्याच्या सहीने वारंट निघणे शक्यच नव्हते. असा आक्षेप होऊन हायकोर्टात अर्ज करण्यात आला होता.

परंतु न्यायमुर्ती हेमियन व तिसरे न्यायमुर्ती पोलक याना हा मुद्दा मान्य नव्हता . तर न्यायमुर्ती भवानीशंकर नियोगी याना हा मुद्दा मान्य होता. या तीन न्यायमुर्तीमध्ये न्यायाच्या बाबतीत तांत्रिक मतभेद उपस्थित झाल्यामुळे सप्तचरंजीवांना दिनांक ६ एप्रिल रोजी होणारी फाशी काही दिवसाकरिता रद झाली होती. यावर अपिल करण्याची तारिख १० एप्रिल ठरली. दिनांक १२ व १३ एप्रिल रोजी अपिलाची सुनावणी झाली होती व तीन न्यायमूर्तीकडे हा खटला सोपविण्यात आला होता. तारिख २६ एप्रिल रोजी न्यायमूर्ती श्री पोलक याच्याकडे सुनावनी सुरु झाली होती. त्यांनी या केसमध्ये शिक्षा बजावल्या असल्यामुळे त्याच्यावर वारंवार आक्षेप घेण्यात आला होता व पुढील सुनावणी ७ मे १९४५ रोजी करण्याचे ठरले होते. सरकारने १६ ऑगष्ट १९४५ रोजी सप्तचिरंजीवांना फाशी देण्याचे निश्चित केले होते. १९४५ रोजी युरोपचे युद्ध संपुष्टात आल्यामुळे विजयदिनाची घोषणा करण्यात आली होती. या निमित्याने सौ. अनसूयाबाई काळे ह्यांनी इंग्लंडच्या बादशहाला फाशी रद्द करावी अशी तार केली होती. हायकोर्टनी न्यायमूर्ती पालक यांचा निर्णय कायदेशीर ठरविल्याने त्याविरूद्ध प्रिव्हीकौन्सिलकडे अपील दाखल करण्यात आले होते व त्यासाठी लागणारा निधी गोळा करण्यासाठी अनसूयाबाईनी वर्तमानपत्रातून जनतेला आवाहन करून ४५.०० जमा केले होते. प्रिव्हीकौन्सिलकडे अपिल दाखल झाल्यामुळे प्रांतीक सरकारने ७ जुनपर्यंत फाशीच्या शिक्षा तहकुब केल्याचा आदेश काढला होता. १३ जुलै १९४५ रोजी महात्मा गांधींनी फाशी रद्द करावी अश्या आशयाचे एक पत्र लॉर्ड वेकेल यांना पाठविले होते. परंतु ३० जुलै १९४५ रोजी कौन्सिलने तो अर्ज फेटाळून लावला होता. ३ ऑगस्ट १९४५ रोजी लंडनचे सॉलिसिटर टी. एल. विल्सन यांना फाशी निवारक समितीचे वकिल अॅड. गंगाधर घाटे यांना chimur regrets special leave refused अशो तार पाठविली होती . त्यामुळे त्याच दिवशी अनसूयाबाई महात्मा गांधीजीना भेटण्याकरिता महाबळेश्वरला गेल्या व त्यांना सर्ववृत्तांत सांगितला. त्यामुळे गांधीजीचे हृदय भरून आले व मानवी प्रयत्न निष्फळ झाले आता परमेश्वरच वाली आहे असे हृदयस्पर्शी उद्गार गांधीजींनी काढले .ऑगस्ट १९४५ रोजी सौ. अनसूयाबाई काळे यांनी गव्हर्नर व्हाइसराय भारतमंत्री व मुख्यप्रधान बादशहा यांना फाशीच्या शिक्षेची अमलबजावणी तहकुब करून आपण पाठविलेल्या दयेच्या अर्जाचा पुन्हा विचार करावा अशी तार पाठवुन विनंती केली परंतु प्रातीक सरकारने पिनल कोडच्या ५४ कलमाखाली अर्ज अडवून धरले होते १६ आगस्ट १९४५ रोजी शेवटच्या प्रयत्न म्हणून पुन्हा एकदा अनसूयाबाईंनी फाशीची शिक्षा रद्द करा अशी तार हाइसरॉयला केली होती. १६ ऑगस्टच्या रात्री रोटरी क्लबमध्ये सप्तचिरजीवांची शिक्षा माफ झाली व सर्वांना सोडण्यात आले .ही आनंदाची बातमी सरकारचे वकिल श्री. विकेडन यांनी अनसूयाबाईना सांगीतली व त्यांचे अभिनंदनही केले होते. लगेच रात्री १०.३० वाजता ही आनंदाची बातमी, तरुण भारताच्या कार्यालयातून पटवर्धन यांनी गांधीजांना दिली होती.

बरोबर तीन वर्षांनंतर हा न्याय मिळाला होता. अशारितीने डॉ. खरे यांच्या अध्यक्षतेखाली जी फाशी निवारण समितीची कल्पना स्फुरली आणि प्रत्यक्षात तो समिती स्थापन करण्यात येऊन त्या समितीने न भुतो न भविष्यती' असे कार्य करून दाखविले. अगदी फासावर जाण्याची वेळ यावी आणि काहीतरी चमत्कार घडावा आणि सप्तचरंजीव सुटावे असा प्रकार दोनदा या केसमध्ये घडला .याचे सारे श्रेय समितीच्या अध्यक्षा श्रीमती अनसूयाबाई काळ यांनाच दयावे लागते, त्यांनी आपली सर्व प्राण, सर्व शक्ती या सप्तचरंजीवांना वाचविण्याकरिता खर्ची लावली होती .तसेच दिल्लीला जाऊन अनेक थोरामाठयांच्या भेटी घेऊन आपला मुद्दा अधिकाऱ्याच्या गळी उतरविण्यात त्यांनी जो विलक्षण चिकाटी व जिद्द दाखविली तिही स्पृहणीय होती. सौ. काळयाना नामवंत वकील रामभाऊ मनोहर, अॅड घाटे, डॉ. केदार, डॉ. खरे, न्या काकासाहेब पुराणिक, न्या. शंकरराव नियोगी इत्यादीचा पाठिंबा होता. नागपूरच्या 'तरुण भारताने' चिमुरचे फाशी प्रकरण आपलेच प्रकरण मानले होते .चिमुर आष्टी प्रकरणात अनसूयाबाईनी जे अतोनात परिश्रम घेतले; ह्यामुळे त्यांचे नाव सर्व हिंदुस्थानात गाजले होते. त्यांच्या या कामगिरीबद्दल महात्मा गांधीजींनी त्यांना जाहीरातीने धन्यवाद दिले व

गव्हर्नर श्री. प्रकाश यांनी खास पत्र लिहुन अनसूयाबाईचे अभिनंदन केले होते. तसेच ठकंडया आनंदा सोनुने राजकैदी न.६२८ यांनी ६ नोव्हेंबर १९४५ रोजी अनसूयाबाईना मातोश्री संबोधून पत्र पाठविले होते. त्या पत्रात त्यांनी 'आपल्या अनंत प्रयत्नामुळे आम्हा सर्वांचा फास परमेश्वराच्या कृपेने तुटला' अशा शब्दात त्यांचे आभार व्यक्त केले होते.

चिमूर-आष्टीच्या सात आरोपींची देहांत शिक्षा गव्हर्नर जनरल यांनी विजयोत्सवाच्या दिवशी रद्द केल्यामुळे सर्व हिंदुस्थानभर आज आनंदाची उर्मी उठली आहे. या आनंदाच्या वेळी ज्यांनी ज्यांनी या फाशी निवारण कार्यात मला वेळोवेळी मदत केली, त्याचे आभार मानणे हे माझे पहिले कर्तव्य आहे. महात्मा गांधी डॉ. खरे, डॉ.भुलाबाई देसाई ॲड. घाटे, ॲड. मनोहर, ॲड सिरास, ॲड. जगन्नाथ प्रसाद, द्विवदी प्रभृतीनी, समितीतील माझ्या सहका-यांनी आणि वऱ्हाड मध्यप्रांतातीलच काय पण अखिल हिंदुस्तानातीतील सर्व जनतेने जे निरनिराळ्या प्रकारचे सहकार्य मला दिले. त्यामुळेच आमचा हा प्रयत्न यशस्वी झाला. समितीने ज्या वेळी हे कार्य हाती घेतले. त्यावेळी ज्या चोवीस जनांना फाशीची शिक्षा झाली होती. त्या सर्वच जणांना वाचविण्यात समितीला यश लाभले हे तिचे भाग्य खरोखरीच स्पृहणीय होय आणि दयाळू परमेश्वराशिवाय आपण दुसऱ्या कोणाचे आभार मानावेत. या आनंदाच्या प्रसंगी माझी त्याला अशी प्रार्थना आहे की, चिमूर-आष्टीप्रमाणे हिंदुस्थानच्या इतराही भागातुन जे अनेक राजबंदी फाशीच्या शिक्षेची वाट पाहत आज तुरुगांत खतपत पडले आहेत, त्यांनाही प्राणदान मिळावे.

## मुल्यांकन

विदर्भाच्या सर्व धर्माच्या जातीच्या सुशिक्षित, अशिक्षित व सामान्य स्थितीतील सर्व स्त्रियांनी राष्ट्रीय चळवळीत भाग घेतला. सौ. अनसूयाबाई यांच्या व्यक्तीमत्वाच्या कार्याचे मूल्यमापन केल्यास असे दिसून येते की विदर्भाच्या इतिहासात ज्या काही राजकारणी स्त्रिया होऊन गेल्या त्यामध्ये सर्वात विवाद्य व्यक्तीमत्व अनसूयाबाई काळे यांचे आहे. सार्वजनिक आणि राजकिय अश्या दोन्ही क्षेत्रात कर्तृत्व दाखवण्याची संधी त्यांना मिळाली. त्यांनी प्रंसगी पत्करलेल्या कारावास, प्रबोधनाच्या मार्गाने केलेली लोकजागृती, पुरुषाच्या बरोबरीने राष्ट्रीय चळवळीत घेतलेला उत्स्फूर्त सहभाग, अन्यायाविरुद्ध समर्थपणे दिलेली झुंज, निर्भिडपणे क्रांतीकारकाना केलेले सहाय्य, यासोबत महात्मा गांधी यांच्या प्रेरणेने विविध चळवळीत घेतलेला स्वयंपूर्ण सहभाग या त्याच्या इतिहास घडविणाऱ्या आणि आजच्या काळात प्रेरक असलेल्या स्मृती आहेत. "कीर्ती श्रीर्वाक्य नारीणां स्मृती मेघा धृति "क्षमा या महिलेतील सुप्तशक्तीचा अविष्कार घडविणाऱ्या त्याच्या कार्याच्या बोलक्या आठवणी आहेत. सार्वजनिक जीवनाचा वसा हा त्यांना त्यांच्या माहेरकडून उपजतच मिळालेला होता. कारण त्याचे वडिल हे बेळगावचे त्या काळातील विख्यात कायदेपंडित कै. स. ब. भाटे हे नाव वकिलीपेक्षा इतकेच सार्वजनिक क्षेत्रातही गाजलेले होते. अशा या कुटूंबात बेळगावला अनसूयाबाईचा जन्म झाला. त्याचे बालपण बव्हंशी खेडयात गेले.

## संदर्भग्रंथसूची :

### प्राथमिक मूळ साधने: मराठी (प्रकाशित)


- काळे पु. बा. "अनसूयाबाई आणि मी' ' प्रथम आवृत्ती, श्री मंगेश प्रकाशन,, पुणे, ऑगस्ट १९६२
- पाठक अ. श. (Ed) नागपूर जिल्हा गॅझिटिअर भाग १(ब)" सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र मुंबई, २००५.
- पूर्व विदर्भ महिला परिषद अहवाल १९२७-१९६०, नागपूर १९२७.

- 'भगिनीमंडळ त्रैवार्षीक अहवाल २००३-२००६, नागपूर २००३

**दुय्यम साधने : मराठी (प्रकाशित)**

- कोठेकर शांता, भालचंद्र अंधारे (Ed). "नागपूर नगरी त्रिशताब्दी ग्रंथ", प्रथमावृत्ती, नागपूर २००३.
- गुर्जर ई. आ. "विदर्भ गौरव "प्रथमावृत्ती, नागपूर, २८ मे २००५.
- गेडाम शं. "स्वातंत्रलढ्यातील नागपूर जिल्हयाचा सहभाग" प्रथमावृत्ती, ऑगस्ट क्रांती सुवर्ण महात्सव समिती नागपूर, ९ ऑगस्ट १९९२.
- जोशी पि. एल. "नागपूर नगरसंस्था शताब्दी ग्रंथ'' प्रथमावृत्ती महानगरपालिका, नागपूर १९६४
- धर्माधिकारी ता. " स्वातंत्र्य लढयातील स्त्री'', प्रथमावृत्ती ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती, मुंबई ऑगस्ट १९९२.
- पवार जयसिंगराव (Ed). अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेसाठी प्रकाशित निबंध" प्रथमावृत्ती युगांतर शिक्षण संस्था नागपूर ४ नोव्हे १९९५.
- पाठक दमयंती. वैदर्भीय महिलाचे स्वातंत्र्य संग्रमातीलसहकार्य 'प्रथमावृत्ती, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर
- फडके य. दि. "विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड ३" प्रथमावृत्ती, श्रीविद्या प्रकाशन, पुणे २ ऑक्टोबर १९९१
- फडके य. दि. "विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड ४" प्रथमावृत्ती, श्रीविद्या प्रकाशन, पुणे १५ एप्रिल १९९३.
- फडके य. दि." विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड ५ " प्रथमावृत्ती, श्रीविद्या प्रकाशन, पुणे १५ एप्रिल १९९७.
- बौस वि. गो. "वर्धा स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास" श्री मंगेश प्रकाशन, नागपूर २००५
- सरस्वती मंदीर सुवर्ण महोत्सव स्मरणिका. प्रथमावृत्ती,

**दुय्यम साधने:** प्रकाशित (हिंदी)

- विदर्भप्रज्ञा–८७. भारतीय इतिहास संकलन योजना बाबासाहेब आपटे स्मारक समिती